Literacy for a Billion

Movie: Aata Ga Baya
Year: 2011

Song: Sajun saj jashi
Lyricist: Guru Thakur & Anil Jagtap

सजवून साज जशी
रूणझुण सांज तशी
सजणी तू रंग बावरी
हो सजवून साज जशी
रूणझुण सांज तशी
सजणी तू रंग बावरी
हो सर अलवार सुखाची
रिमझिमे जशी
छेडी अलगूज जणू
श्वासातूनी आज कुणी
हरपून भान अशी
मिठी तुझीच तशी
सजणा मी सांज सावली

अं नजर तुझी ही
प्रिया वेड लावी
भिरभिरते मी
अशी भोवताली
गोऱ्या गोऱ्या गालावरी
आज लाज आली
अवखळ डोळ्यात या
प्रीत गीत झाली
अशी भूल जीवाला या पडते
मखमल मनी उलगडते
काळजाच्या काठावर हलके
छेडी कुणी तार जशी
हो ला ला ला ला ला र ला ला ला
ला ला ला ला ला र ला ला ला
सजणा मी सांज सावली

हरपून भान अशी
मिठी तुझीच तशी
सजणा मी सांज सावली
हो सर अलवार सुखाची
रिमझिमे जशी
छेडी अलगूज जणू
श्वासातूनी आज कुणी
सजवून साज जशी
रूणझुण सांज तशी
सजणी तू रंग बावरी

दव हळवे मी धुके धुंद व्हावे
बिलगून राणी तुला पांघरावे
विसरून थांग सावली तुझीच व्हावे
अलगद वाटे रे तुझ्यात मी भिनावे
तुझ्यासाठी अशी तळमळते
तुझ्याभोवताली घुटमळते
पुनवेच्या चांदासाठी झुरते
वेडीपिशी रात जशी
सजवून साज जशी
रूणझुण सांज तशी
सजणी तू रंग बावरी
हो सजवून साज जशी
रूणझुण सांज तशी
सजणी तू रंग बावरी
हो सर अलवार सुखाची
रिमझिमे जशी
छेडी अलगूज जणू
श्वासातूनी आज कुणी

हरपून भान अशी
मिठी तुझीच तशी

सजणा मी सांज सावली

Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.